# विश्वबंधुत्व

ॐ

सत्यान्नास्ति परोधर्मः

मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनचे द्वैमासिक

ऑक्टोबर – नोव्हेंबर २०१९

# मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन

प्रकाशक
अध्यक्ष
मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन

वर्ष २०१९ | ऑक्टोबर–नोव्हेंबर | अंक १ ला

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक / लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | संपादकीय – बंधु (ॲड.) संजय दि. पोटे | २ |
| २. | म. थि. फे. नवीन कार्यकारिणी सदस्य | ४ |
| ३. | थिऑसॉफिकल सोसायटी म्हणजे काय?<br>ले. – सी. डब्लु. लेडबीटर | ५ |
| ४. | थिऑसॉफिस्टची कर्तव्ये | १० |
| ५. | दामोदर आणि थिऑसॉफिकल चळवळ<br>प्रेषक – बंधु नितीन अभ्यंकर, पुणे. | ११ |
| ६. | जागृति, स्वप्न, सुषुप्ति व तुरिया<br>ले. – राजाराम सखाराम भागवत, एम्. ए., ठाणे. | २० |
| ७. | ॲनी बेझंट यांचा म. थि. फे. ला संदेश<br>अनुवाद – बंधु र. गं. भडभडे, पुणे. | २७ |
| ८. | लॉज वार्ता | २८ |


**या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मतांशी संपादक मंडळ आणि मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन सहमत असेलच असे नाही.**

**मूल्य : रु.        वार्षिक वर्गणी : रु.**

# संपादकीय

प्रिय बंधु-भगिनी,

''जगात कोठेही असा, मातृभाषेचा जपा वसा'' ह्या उक्तीचे स्मरण होण्याचं एक कारण आहे, ते म्हणजे 'विश्वबंधुत्व' ह्या आपल्या मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनच्या मुखपत्राची ओळख जगभरातील मराठी वाचकांपर्यंत पोहचवण्याचे प्रयत्न आपण करीत आहोत. आता आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे ''ई-विश्वबंधुत्व'' तयार करण्यात आले आहे. ई-विश्वबंधुत्वाचा हा पहिलाच अंक आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात ई-विश्वबंधुत्व पोहोचविण्याची व्यवस्था झालेली आहे. त्याचा लाभ जास्तीत जास्त वाचकांना मिळावा ही अपेक्षा!

'ई-विश्वबंधुत्वाचा' (परंपरागत) प्रकाशित अंक वाचण्याची व जतन करण्याची मजा मात्र वेगळीच. त्यामुळे प्रकाशित अंक हा राहणारच! किंबहूना प्रकाशित अंकाच्या वाचकांची संख्या अधिकाधिक वाढवण्यासाठी आपण प्रयत्न करतच राहू. नियमित आणि दर्जेदार साहित्य प्रकाशनाचे आव्हान आपणासमोर आहे. काही नवीन लेख व लिखाणमाला प्रसिद्ध व्हायला हव्यात. नवीन अभ्यासक व लेखक स्वयंस्फूर्तीने समोर यायला हवेत. थिऑसॉफीचे उपलब्ध ज्ञान, थिऑसॉफीच्या शिकवणुकीमुळे प्राप्त झालेल्या ज्ञानाचे वैयक्तिक वा सामाजिक प्रकटीकरण, त्यासंबंधी विचारमंथन, थिऑसॉफीकल लॉजेस्‌मधील उपक्रम, ह्याचसोबत थिऑसॉफीकल सोसायटीमधील फेडरेशन, इंडियन सेक्शन व आंतरराष्ट्रीय सेक्शनमधील काही महत्वाच्या वार्ता विश्वबंधुत्वामध्ये देण्यात येतील. ''प्रश्न तुमचा, उत्तर देण्याचा प्रयत्न आमचा'' हे नवे सदर लवकरच सुरू करण्याचा मानस आहे. त्यासाठी तुम्हास भेडसवणारा प्रश्न किंवा समस्या आमचेकडे पाठविल्यास त्याचे निराकरण करून ते प्रसिद्ध करता येईल.

'विश्वबंधुत्व' प्रकाशनाची जबाबदारी मराठी थिऑसॉफीकल फेडरेशन (म.थि.फे.) च्या पुढील ३ वर्षांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या नवीन कार्यकारिणीकडे आलेली आहे. बंधु ॲड. संजय पोटे (अध्यक्ष), बंधु अरूण पालकृत (सचिव), बंधु कौस्तुभ भडभडे (कोषाध्यक्ष), भगिनी प्रविणा शहा (उपसाचिव) हे प्रमुख पदाधिकारी. विश्वबंधुत्वाच्या प्रकाशनाची धुरा बंधु नितीन अभ्यंकर यांनी स्विकारली असून बंधु अशोक सोनोने यांची मोलाची

साथ त्यांना मिळणार आहे. बंधु शशांक बुरसे, भगिनी नीला अभ्यंकर, भगिनी माया जाधव आणि बंधु पालकृत हे विश्वबंधुत्वच्या प्रकाशन व वितरणासंबंधी कार्यात मदत करणार आहेत.

नुकतेच (२१ ते २३ सप्टेंबर २०१९) म. थि. फे. चे ८८ वे वार्षिक अधिवेशन खामगाव (जि. बुलढाणा) येथे संपन्न झाले. महाराष्ट्रातील बहुसंख्य थिऑसॉफीकल लॉजेस्‌चे सभासदांनी अधिवेशनास उपस्थिती लावली. 'सिद्धसंघ व त्यांचा संप्रदाय' (Masters & the Path) हे अधिवेशनाचे विचारसुत्र होते. ह्या विचारसुत्रासंबंधीची विविध लघुभाषणे व व्याख्याने ऐकण्याची मेजवानी उपस्थितांना मिळाली. सर्व वक्त्यांनी अभ्यासपूर्ण विवेचने केली. बंधु शिंदे (अड्यार), बंधु शांताराम कुंटे व डॉ. अशोक सोनोने (अकोला), बंधु मिरजकर (सांगली) यांची व्याख्याने व भाषणे वैशिष्ठ्यपूर्ण होती. या अधिवेशनाची संपूर्ण व्यवस्था भगिनी प्रविणा शहा व त्यांच्या सहकाऱ्यांनी अतिशय चोखपणे पार पाडली. पुढील अधिवेशनाचे (सप्टेंबर २०२०) स्थान लवकरच निश्चित होईल. १४४ वे आंतरराष्ट्रीय अधिवेशन दि. ३० डिसेंबर २०१९ ते ५ जानेवारी २०२० या दरम्यान वाराणसी (उ. प्र.) येथे होणार आहे. म. थि. फे. तर्फे दि. २३ ते २७ मे पर्यंत भोवाली (उत्तराखंड) येथे अभ्यासवर्ग होणार असून या दरम्यान नैनीताल ह्या निसर्गरम्य ठिकाणी भेट देता येईल. यासाठी नावनोंदणी सचिव, म. थि. फे. यांचेकडे लवकरात लवकर करून आपला सहभाग निश्चित करावा. थिऑसॉफीकल सोसायटी अंतर्गत होणाऱ्या कार्याला गती मिळावी व याद्वारे लोकोपयोगी कार्ये व्हावीत यासाठी इंडियन सेक्शनने 'स्मार्ट गोल्स्' (ध्येयनिश्चिती) हा अभिनव उपक्रम २०१८-१९ पासून सुरू केला आहे. भारतातील कार्यरत फेडरेशनमध्ये म. थि. फे. ने या उपक्रमात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. यासाठी अथक परिश्रम घेणारे बंधु एन्. एन्. राऊत, बंधु ए. एस्. सोनोने व बंधु कदम (अकोला) यांचे कौतुक करावे तेवढे कमीच! सन २०१९-२० च्या ध्येयनिश्चितीचा कार्यक्रम तयार करण्यात आला असून नवीन सभासद वाढवण्यावर तसेच थिऑसॉफीकल लॉजेस्‌मधील उपक्रम वाढवण्यावर भर देण्यात आला आहे.

प्रत्येक थिऑसॉफीकल लॉज व सेंटरमध्ये साप्ताहिक सभा व अध्ययन न चुकता व्हावे तसेच अधूनमधून सार्वजनिक उपक्रम घेण्यात यावेत. प्रत्येक सभासदाने या साप्ताहिक सभांमध्ये सहभागी व्हावे अशी मूळ कल्पना आहे.

कारण यामुळेच या ठिकाणी विश्वबंधुत्वाची केंद्रे निर्माण होऊन फार मोठे कार्य होत असते असे थिऑसॉफीकल सोसायटीच्या संस्थापकांनी नमूद केले आहे याची आपणा सर्वांना आठवण असावी.

आंतरराष्ट्रीय थिऑसॉफीकल सोसायटीचा १७ नोव्हेंबर हा वर्धापन दिन. त्यानिमित्त सर्वांना शुभेच्छा.

आपला बंधु
संजय दि. पोटे (ॲड.)
अध्यक्ष, म.थि.फे., पुणे.

---

## मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनचे २०१९ ते २०२२ या कालावधीसाठीचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य

१) ॲड. संजय दि. पोटे, पुणे – अध्यक्ष
२) बंधु रामन्ना सी. माळी, सांगली – उपाध्यक्ष
३) बंधु अरूण पालकृत, पुणे – सचिव
४) बंधु कौस्तुभ भडभडे, पुणे – कोषाध्यक्ष
५) भगिनी प्रवीणा शाह, खामगाव – उपसचिव
६) बंधु जे. के. जाधव, बेळगाव – कार्यकारिणी सदस्य
७) बंधु डी. एस. कारखानीस, सांगली – कार्यकारिणी सदस्य
८) बंधु ए. पी. लोखंडे, नागपूर – कार्यकारिणी सदस्य
९) बंधु एस. के. विसाळ, मालेगाव – कार्यकारिणी सदस्य
१०) भगिनी एस. एन. मेहेत्रे, नागपूर – कार्यकारिणी सदस्य
११) बंधु ॲड. एन. डी. राऊत, अमरावती – कार्यकारिणी सदस्य
१२) बंधु डॉ. ए. एस. सोनोने, अकोला – कार्यकारिणी सदस्य
१३) बंधु एन. एन. राऊत, अकोला – कार्यकारिणी सदस्य
१४) बंधु प्रा. एन. डी. अभ्यंकर, पुणे – आमंत्रित
१५) बंधु प्रा. सी. ए . शिंदे, अड्यार, चेन्नई
– इंडियन कॉन्सिल रिप्रेझेंटेटिव्ह.

# थिऑसॉफिकल सोसायटी म्हणजे काय?

**ले. – सी. डब्ल्यू. लेडबीटर**

**(पुर्नमुद्रित लेख)**

आपल्या काही सभासदांना सोसायटीचे महत्व व अधिकार नीट कळला नाही असे दिसते. रॉयल जिऑग्रॉफिकल सोसायटीप्रमाणे एखाद्या शास्त्राच्या विशिष्ट शाखेची प्रगति करण्याकरिता ही स्थापिली गेलेली सोसायटी नाही. एखाद्या विविक्षित धर्ममताचा प्रसार करणारी तर ही मुळीच नव्हे हे उघड आहे. हल्लीच्या काळी ती जे कार्य करीत आहे ते दुसरी कोणतीही संस्था करीत नाही. कारण तिची मूळ पीठिकाच निराळी आहे. ती समजण्याकरीता जगाच्या इतिहासाच्या अंतरंगाकडे क्षणभर पाहिले पाहिजे.

हे जग वाटेल त्या दिशेकडे वहावत जात नसून त्याची व्यवस्था व योगक्षेम सिद्धसंघाकडे सोपविलेला आहे हे ज्यांनी गुप्तविद्येचे परिशिलन केले आहे त्यास माहीत आहेच. आम्ही ज्यास आमचे सद्गुरू म्हणतो ते त्या संघापैकीच आहेत. त्यांनी सांगितलेली साधने संपादन करून मनुष्य अधिकारी बनला म्हणजे ते शिष्य या नात्याने त्याचा स्वीकार करतात हा त्यांचा आपल्यावर मोठा अनुग्रह आहे. परंतु सर्व सिद्ध गुरू असतातच असे नाही. त्यातूनही सर्व शिष्य स्वीकार करतात असेही नाही. ते जरी आत्मविद्येत सारखेच निष्णात आहेत तरी यापैकी पुष्कळ सिद्ध अन्य मार्गाने जगाचे हित करण्यास सदासर्वकाळ झटत असतात. सर्व जगाच्या आध्यात्मिक उन्नतीकरता त्यांनी पृथ्वीचे भाग पाडून ते वाटून घेतले आहेत. त्या भागांची आध्यात्मिक व्यवस्था व देखरेख ते करतात. निरनिराळ्या भागांचे निरनिराळे अधिपती आहेत.

कोणत्याही धर्मातील मनुष्यास आपल्या धर्मातून बाहेर नेण्याकरता थिऑसॉफिकल सोसायटी जगात आली नाही. उलट आजपर्यंत कोणी न केलेले कार्य ती करीत आहे. लोकांना आपला धर्म काय आहे हे समजणे तिने सुलभ केले आहे. धर्माप्रमाणे आचरण कसे ठेवावे हेही ती सांगते. निरनिराळ्या धर्मातील नामशेष झालेल्या उच्च तत्त्वांचे पुनरुज्जीवन करून त्या तत्त्वातील गूढ अर्थ स्पष्ट करून दाखविते. याचा पुष्कळ ठिकाणी सुपरिणाम होऊन आपआपल्या धर्मसंबंधाने ज्ञानपूर्वक उच्चतर श्रद्धा लोकांमध्ये उत्पन्न झाली आहे. काही लोक मनातून फार धर्मशील असतात पण त्यांना जुन्या मतांमधील

कोत्या गोष्टी मान्य नसतात. अशा लोकांना थिऑसॉफीने केलेली विषयाची मांडणी फार पसंत पडते. सोसायटीत असलेले सहिष्णुत्त्व व माणसांच्या बुद्धीस पडण्यासारखे तिचे तत्त्व-विवेचन ही त्यास अंतःकरणापासून संमत असतात. या सोसायटीत हिंदू, मुसलमान, बौद्ध, जैन, ख्रिस्ती, पार्शी, यहुदी जातीचे मेंबर आहेत. सोसायटीतील एखादी अधिकाररूढ व्यक्ति आमच्या धर्माविरूद्ध काही बोलली अशी तक्रार आजपर्यंत कोणीही केलेली ऐकिवात नाही. उलट ज्या ठिकाणी सोसायटी स्थापन झाली आहे त्या ठिकाणी आध्यात्मिक व धार्मिक जागृती झालेली आढळते.

असे होण्याचे कारण सर्व धर्म त्या महान सिद्धमंडळापासून निघाले आहेत हे होय. वर सांगितलेल्या सिद्धसंघात निरनिराळ्या शाखा आहेत; त्यापैकी धर्म-शिक्षा ही एक शाखा असून तिच्या अध्यक्षाने युगधर्म व जीवाची उत्क्रांति यास योग्य असे अनेक धर्म स्वतः अवतार घेऊन शिष्यांच्या मार्फत जगात स्थापन केले आहेत. या सर्व धर्मांची तुलना केली तर कोणासही असे दिसून येईल की, त्यात तत्त्व किंवा सिद्धांत एकच असून त्यांची मांडणी मात्र निरनिराळ्या तऱ्हेने केली आहे. निरनिराळे धर्म ही निरनिराळी दर्शने आहेत. धर्माच्या बाह्य रूपात बराच फरक आहे खरा. पण सारभूत व्यापक तत्वे तीच आहेत. सर्व धर्मांनी तेच गुण संपादक करण्याविषयी उल्लेख केला आहे व त्याच दुर्गुणांची निंदा केली आहे. एखाद्या सात्विक मुसलमान अथवा ख्रिस्ती यांच्या चरित्रात काहीच फरक नाही. ते तीच कर्मे करतात पण त्यास नावे निराळी देतात. एक ईश्वराची प्रार्थना करण्यात आपला बराच काल घालवितो. दुसरा ध्यानमग्न असतो. पण अभ्यास तोच आहे. धर्मशील मनुष्य न्यायी, उदार, प्रेमळ, सत्यप्रिय असला पाहिजे हे सर्वांस कबूल आहे. यात मतभेद नाही.

असे सांगतात की, शेकडो वर्षांपूर्वी या सिद्धमंडलाच्या मुख्य अधिकाऱ्यांनी असे ठरविले आहे की, जगाच्या हिताकरिता प्रत्येक शतकाच्या चतुर्थ चरणात कोणत्या तरी मार्गाने विशेष प्रयत्न करण्यात यावा. या प्रयत्नापासून झालेल्या काही चळवळी सहज लक्ष्यात येण्यासारख्या आहेत. चौदाव्या शतकात ख्रिश्चन रोझन क्रूझ याने एक चळवळ उत्पन्न केली. त्याच वेळी महायान बौद्ध मतात त्सॉंकापा याने सुधारणा आरंभिल्या. पंधराव्या शतकात ग्रीक व लॅटीन ग्रंथांची भाषांतरे झाली. त्यांचे परिशीलन झाले व मुद्रणकलेचा आरंभ झाला. सोळाव्या शतकात अकबराने हिंदुस्थानात एक महत्कार्य आरंभिले.

इंग्लंडात व इतर देशांत ग्रंथ झाले. एलिझाबेथ युगाची तेजस्वी घटना याच वेळी झाली. सतराव्या शतकात रॉयल सोसायटीची स्थापना झाली व रॉबर्ट वॉईलने रासायनिक शोध लावले. अठराव्या शतकातही घडामोडी झाल्या. पण त्यावर सत्ता न राहिल्यामुळे फ्रेंच राज्यक्रांति झाली. तिचा अंतरंग इतिहास फारच थोड्या लोकांना माहित आहे. एकोणिसाव्या शतकात थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना झाली.

आजपर्यंत जगद्धितार्थ ज्या चळवळी झाल्या त्यापैकी थिऑसॉफिकल सोसायटी ही एक असून आतापर्यंत केलेल्या कार्याहूनही मोठे कार्य ती करणार आहे. ती पुढे जे कार्य करणार आहे, त्याच्या मानाने आजपर्यंत तिने केलेले कार्य प्रस्तावनेदाखल आहे. आजतागायत दिसत आहे त्यापेक्षा तिचे महत्व फार मोठे आहे. जगद्धितार्थ आजपर्यंत झालेल्या चळवळी व थिऑसॉफिकल सोसायटी यात फरक असा आहे की, मैत्रेय ऋषींचा अवतार होणार असे सांगणारी ही पहिलीच संस्था आहे व बुद्धितत्वप्रधान सहावा मानववंश निर्माण होण्याची तयारी करणारी ही पहिलीच मंडळी आहे. सोसायटीचे स्थापक कर्नल ऑलकॉट व मॅ. ब्लॅव्हॅट्स्की हे ज्यांचे शिष्य होते, ते मरूनामक ऋषि (Master M) या सहाव्या वंशाचे मनु आहेत व त्यांचे सहचर देवापि ऋषि (Master KH) यांजकडे त्या वंशामध्ये धर्मशिक्षाप्रसार करण्याचे काम आहे.

या दोन महात्म्यांना जे महत्कार्य करावयाचे आहे. ते सिद्धीस नेण्यास कार्यनिष्ठ गुरूभक्तिपरायण असा मोठा समुदाय पाहिजे. या समुदायात इतर गुणापेक्षा स्वामीनिष्ठा, आज्ञापालन, कष्टाळूपणा हे गुण मुख्यतः पाहिजेत. दुसऱ्या मोठ्या सद्गुणांची गरज नाही असे नाही, पण हे गुण पाहिजेतच. कुशाग्रबुद्धी, चातुर्य, कल्पकता, कर्तृत्व, इत्यादि गुणांचा विकास होण्यास अवकाश आहेच. परंतु हे सर्व गुण असूनही जर आज्ञाधारकपणा व गुरूभक्ति हेही गुण त्याबरोबर नसतील तर त्या इतर गुणांचा या महत्कार्यात काही उपयोग होणार नाही, अहंमन्यता ही या मार्गात एक मोठी धोंड आहे. माझ्या वरच्या अधिकाऱ्यापेक्षा मला अधिक कळते, या समजुतीने जो आज्ञेचे पालन करीत नाही, स्वतःची सर्व अहंता एकीकडे ठेवून जो फक्त कार्याकडेच दृष्टी देत नाही व आपल्या गुरूबंधूंशी ज्यास मिळून मिसळून काम करता येत नाही असा शिष्य मनूच्या कारभारात निरूपयोगी आहे या शिष्यमंडळात जे येतील त्यांना मरणोत्तर स्वर्गवासाचा त्याग करून नवीन वंशात लवकर लवकर जन्म

घ्यावे लागतील. त्यांनी आपल्या निरनिराळ्या उपाधि मनूंनी घालून दिलेल्या नमुन्याप्रमाणे बनविल्या पाहिजेत. हे काम फारच श्रमाचे व कठिण आहे. पण सहाव्या वंशात जो मनबुद्धिविकास पावलेला सुंदर नमुना उत्पन्न होणार आहे तो तयार करण्याकरिता हे श्रमाचे कार्य झालेच पाहिजे. या महत्कार्यास हातभार लावण्याची संधी सध्या आपल्यास दिली आहे.

या देवकार्यात सेवा करण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनी प्रवृत्तिमार्गावरील प्राकृत जनांपेक्षा आपले जीवनहेतु निराळे आहेत, हे मनात वागविले पाहिजे. त्या मोठ्या चळवळीत आपल्यास काम मिळावे, अशी ज्यांची इच्छा असेल त्याने सध्या आपल्याला जे काम दिले आहे, ते उत्तम रितीने करून दाखवून आपली हौस व तयारी व्यक्त केली पाहिजे. हिंदुस्थानात श्रीकृष्ण या रूपाने व ख्रिस्ती लोकांना ख्राइस्ट या रूपाने ज्यांनी धर्मोपदेश केला ते भगवान मैत्रेय बुद्ध जगाच्या कल्याणाकरिता बहुतेक नष्टप्राय झालेल्या आध्यात्मिक तत्त्वांचे पुनरूज्जीवन करण्याकरता लवकरच जगात येणार आहेत. त्यांच्या आगमनाने मिळणाऱ्या अपूर्व संधीचा लाभ पुष्कळ लोकांना घेता यावा, या हेतूने पूर्वीच लोकांची अंतःकरणे सात्विक व उत्सुक करणे हे थिऑसॉफिकल सोसायटीचे सध्या मोठे कार्य आहे. दोन हजार वर्षांपूर्वी येऊन त्यांनी स्थापन केलेला धर्म जरी आज दूरवर पसरला आहे तरी ख्रिस्ताने देह सोडल्यानंतर आता पुढे काय करावे यासंबंधाने वाटाघाटी करण्याकरिता जेव्हा त्यांच्या शिष्यांची सभा जमली त्या वेळेस त्या शिष्यांची संख्या फक्त एकशेवीस होती असे म्हणतात. त्याकाळी एकच धर्मोपदेशक त्यांचा प्रचारक होता. आता तेच काम बावीस हजार लोकांची व सर्वजगात शाखा असलेली थिऑसॉफिकल सोसायटी करणार आहे. त्या जुन्या कालापेक्षा या विसाव्या शतकात आपल्या हातून काही जास्त घडून येईल काय? आपल्या प्रेमाच्या पाशाने तीन वर्षांपेक्षा जास्त आपणास त्यांना येथे ठेऊन घेता येईल काय? काय होईल ते पहावे. सोसायटीच्या पौरूषावर, प्रयत्नावर व स्वार्थत्यागावर सर्व अवलंबून आहे.

सर्व जगात गुप्त विद्येचा प्रसार करणे हा सोसायटीचा मुख्य हेतु असून या विद्येचे परिशिलन करून प्रसार करण्यास तयार असलेले गुप्त विद्याभिलाषी लोक एका संस्थेत ओढून घेणे हा दुय्यम हेतु आहे. यापैकी काही नेटाने या मार्गात पुढे जाण्याची इच्छा करून थिऑसॉफीचे सर्व ज्ञान संपादन करतील व आपल्या ज्ञानाची खरी वाढ करून घेतील. यापैकी निवृत्ति मार्गावर स्वतः

चार पावले चाललेल्या लोकांपैकी काही पुढील कार्याकरिता सद्गुरू निवडून घेतील. सोसायटीच्या गुप्त मंडळातील लोकांनादेखील हा मान प्राप्त होईलच अशी खात्री देता येत नाही, कारण पसंत करणे सर्वस्वी त्यांच्या हाती आहे. आम्हाला एवढेच सांगता येते की, पूर्वी अशा प्रकारचे शिष्य निवडले गेले आहेत व आपण होऊन कार्य अंगावर घेणारा समुदाय पाहिजे आहे.

गुप्त विद्येचे ज्ञान मिळविण्याची व सद्गुरूंशी निकट परिचय होण्याची संधी सोसायटीच्या सदस्यास मिळते हे माहीत नसून काही लोक सोसायटीत आले आहेत. पुष्कळ लोक मनात काही विशेष हेतु न धरता सहज आस्थेवाचून आले आहेत. आपण किती महत्वाच्या कामात हात घातला आहे हे त्यांना माहीत नसते; काही न कळून जसे ते बेफिकरीने येतात तसेच त्यांना हे काय आहे याचे ज्ञान न झाल्यामुळे ते सोडूनही जातात. त्यांना ज्ञान असते तर त्यास खरोखर मोठा लाभ झाला असता. तरी त्यांना थोडा तरी लाभ झाला आहे यात शंका नाही. यासंबंधाने काउंटेस ऑफ वाकमाइस्टर यांनी एक अशी गोष्ट सांगितली होती की, एकदा मॅडम ब्लॅव्हॅट्स्की यांचेकडे काही मंडळी सहज भेटावयास आली व आम्ही सभासद होतो असे म्हणाली. मॅडम ब्लॅव्हॅट्स्की यांनी ताबडतोब सभासद होण्याचे फॉर्म मागवून त्यांना दाखल करून घेतले. तेव्हा काउंटेस वाकमाइस्टर म्हणाल्या, हे सभासद काय कामाचे आहेत? सोसायटी काय आहे हे पाहण्याकरिता किंवा शिष्टाचाराकरिताच हे सभासद झालेसे मला वाटते. त्यावर मॅ. ब्लॅव्हॅट्स्कींनी सांगितले की, तुम्ही म्हणता ते खरे आहे. केवळ औपचारिक मेंबर झाल्यामुळे सोसायटीचा व त्यांचा अदृश्य संबंध जडला आहे व तो जरी अल्प असला तरी पुढील जन्मी त्यांना तो उपयोगी पडेल.

सोसायटीच्या अध्यक्षांचे धोरण पसंत नाही म्हणून काही सभासद सोडून गेले आहेत, हे इतके खुळेपणाचे आहे की ते खरे आहे असा विश्वास पटणे ही दुर्घट आहे. अध्यक्ष जाणे व धोरण जाणे हा जो योग्य मार्ग त्याकडे त्यांनी लक्ष दिले नाही. तसेच ज्याअर्थी अध्यक्षपदावरील व्यक्ती ही सर्व दृष्टीने इतरांपेक्षा अधिक ज्ञानी आहे त्याअर्थी त्याचे धोरण पत्करण्यास तिला फारच चांगली कारणे असली पाहिजेत हेही त्यांनी लक्ष्यात घ्यावयास पाहिजे होते.

★★★

# थिऑसॉफिस्टची कर्तव्ये

१. आपल्या प्रत्येकाच्या जीवनातील आद्य कर्तव्य व सर्वश्रेष्ठ समाधान म्हणजे, मुली, दुसऱ्यांना दुःख न देणे आणि आपल्याकडून माणसाला किंवा जनावराला यातना न व्हाव्यात यासाठी सदासर्वदा प्रयत्न करणे.

– महात्मा कुथूमी

1. The greatest consolation in the foremost duty of life, child, is not to give pain, and avoid causing suffering to man or beast.

- Master K. H.

२. प्रत्येक थिऑसॉफिस्टने आपले कर्तव्य करावे, जे तो करू शकतो व त्याने केले पाहिजे, म्हणजे परिणाम स्वरूप: लवकरच थिऑसॉफिकल सोसायटीच्या प्रत्येक शाखेच्या सभोवतालच्या वस्त्यांमध्ये मानवी दुःख कमी झाल्याचे दिसेल.

– ल्युसिफर

2. Let every Theosophist only do his duty, that which he can and aught to do, and very soon the sum of human misery, within and around the areas of every Branch of your Soceity, will be found visibly diminished.

- Lucifer

३. आमच्यासाठी कायदा म्हणजे कायदा; अशी कोणतीच शक्ती नाही जी आमच्या कर्तव्य पालनात रतिभरसुद्धा कमी करण्यास आम्हाला भाग पाडील.

– महात्मा मौर्य

3. Law is law with us, and no power can make us abate one got or little of your duty.

- Master M

# दामोदर आणि थिऑसॉफिकल चळवळ

**प्रेषक – नितीन अभ्यंकर, पूना लॉज.**

**(मी पूना लॉजमध्ये जुलै २०१९ पासून महिन्यातून एकदा या विषयावर बोलत आहे. तेच व्याख्यान येथे क्रमशः देत आहे.)**

या व्यासपीठावरून थिऑसॉफीची तत्वप्रणाली, विचार, त्यासंबंधी तत्वज्ञान यावर बरेच बोलले जाते. थिऑसॉफीचे योगदान देणाऱ्यांपैकी एच. पी. बी, एच. एस. ओ., ॲनी बेझंट, कर्नल ऑलकॉट यांचे जीवन, चरित्र व कार्य याबद्दल सांगितले जाते. पण याशिवाय या चळवळीत इतर अनेक महान व्यक्ती आहेत ज्यांचे मानवतेसाठीचे योगदान तितकेच महत्वाचे आहे पण यांच्याबद्दलची माहिती खूपच कमी वेळा या व्यासपीठावर सांगितली जाते. हीच परिस्थिती थिऑसॉफीय वाङ्मयाची आहे. एकतर खूप कमी सदस्य पुस्तकांचे वाचन व अभ्यास करतात, जे करतात त्यातले फारच थोडे अशी चरित्रे अभ्यासतात. माझा इथे अशी एका चेल्याबद्दलची माहिती सांगण्याचा अल्पमती प्रयत्न आहे. ही माहिती मी व्याख्यानमाला या स्वरूपात प्रत्येक महिन्यातून एकदा सांगणार आहे.

महात्म्यांच्या प्रेरणेने थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना झाल्यानंतर अनेक व्यक्ती संस्थापकांच्या – एच. एस. ओ. आणि एच. पी. बीं च्या – संपर्कात आल्या आणि प्रभावित झाल्या, त्यांचे आयुष्य आमुलाग्र बदलले. या सर्वांनी आपापल्या परीने, क्षमतेप्रमाणे थिऑसॉफीच्या प्रसारात योगदान दिले. १८७९ साली सोसायटीचे मुख्यालय भारतात आल्यानंतर विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्ती थिऑसॉफीच्या शिकवणीच्या व संस्थापकांच्या सानिध्यात आल्या. विशेषतः आध्यात्मिक प्रगती झालेल्या, कमी अधिक आंतरिक विकास झालेल्या व्यक्ती जेव्हा एच. पी. बीं च्या सानिध्यात आल्या, तेव्हा त्यांना स्वगृही आल्याची जाणीव प्रकर्षाने झाली, कित्येकांच्या गतजन्मींच्या स्मृती जागृत झाल्या, अशा जीवात्म्यांचा आध्यात्मिक प्रवास मागील जन्मातून पुढे चालू झाला.

अशीच एक अतिशय महत्वाची व्यक्ती म्हणजे 'दामोदर के. मावळणकर'. दामोदर यांचे थिऑसॉफीतील योगदान त्यामानाने अल्पकाळच होते (असे का हे आपण यथावकाश पाहूच) पण हे योगदान अतिशय मूलभूत, बहुमुल्य आणि

मोलाचे होते. तर आपण आज आणि प्रत्येक महिन्याच्या एका रविवारी ''दामोदर आणि थिऑसॉफीची चळवळ'' या सूत्राला धरून काही माहिती करून घेऊ या.

History has always been one of man's greatest teachers; its heroes have epitomized the eternal struggle of mankind for the necessaties of physical existence and their yearning for a spiritual life. Each century has its own pioneers and its martyrs.

याच प्रेरणेने आणि उद्देश्याने एच. पी. बी., एच. एस. ओ., W. Q. Judge आणि इतर १४ व्यक्ती एकत्र आल्या. त्याकाळी प्राबल्य असलेला भौतिकवाद (materialism), धार्मिक भोळेपणा आणि हटवाद (religious bigotry) यासंदर्भात लोकांमध्ये जागृती व्हावी, लोक अधिक शहाणे व्हावेत या उद्देशाने थिऑसॉफीकल सोसायटीची स्थापना केली. या संस्थेच्या कार्याने आणि अग्रगण्य धुरिणांनी एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या २५ वर्षात आपला ठळक ठसा उमटवला.

'आयसिस अनव्हेलड्' या एच. पी. बीं च्या ग्रंथाने आणि त्यापाठोपाठ आलेल्या 'दी ऑकल्ट वर्ल्ड' या ए. पी. सिनेट यांच्या पुस्तकामुळे थिऑसॉफीकल सोसायटीकडे जगभरातील अनेक विद्वान, विचारवंत, सामान्यजण आकृष्ट झाले. भारतात आल्यानंतरच्या पहिल्या वर्षात भारतामध्ये जे लोक सोसायटीत आले त्यापैकी एक दामोदर होते.

दामोदर यांचा जन्म सप्टेंबर १८५७ मध्ये अहमदाबाद, गुजरात येथे कऱ्हाडे ब्राम्हणाच्या श्रीमंत कुटुंबात झाला. त्यांचे धार्मिक शिक्षण व संस्कार परंपरेने झाले. वय १० ते १४ मध्ये ते अतिशय पारंपारिक, धार्मिक वृत्तीचे होते. त्यांना इंग्रजीचे उत्तम शिक्षण मिळाले आणि याचे दाखले वारंवार त्यांच्या लिखाणात आपणास दिसतात. त्यानंतर त्यांच्या विचारांवरचा धार्मिक पगडा कमी झाला. बालपणी दामोदर यांना गंभीर आजार होते आणि डॉक्टर त्यांच्या तब्येतीबद्दल एकंदरीत निराश होते. घरच्यांनी गृहीतच धरले होते की दामोदर कोणत्याही क्षणी प्राण सोडतील. त्यांच्या या अवस्थेतच त्यांना काही दृष्टांत झाले आणि याचा दामोदरवर खूप खोलवर परिणाम झाला. दामोदर यांना जाणवले की त्यांना जणू स्वप्न पडले आहे आणि त्यात एका तेजःपुंज व्यक्तीने त्यांना एक विशिष्ट औषध दिले व आश्चर्य म्हणजे त्या क्षणापासून बालकाची तब्येत सुधारू लागली. काही वर्षांनंतर जेव्हा दामोदर ध्यानात होते तेव्हा त्यांना याच

तेजःपुंज व्यक्तीचे दर्शन घडले आणि हेच आपले रक्षणकर्ते त्यावेळी होते याची त्यांना खात्री झाली. त्यांच्या या रक्षणकर्त्याने म्हणजेच त्यांच्या गुरूदेवांनी त्यांना दोन वेळा मरणाच्या दारातून परत आणले होते.

एच. पी. बीं चे 'आयसिस अनव्हेलड्' हे पुस्तक डी. के. यांनी वाचले व त्याचा प्रभाव त्यांच्यावर पडला. यावेळेपर्यंत एच्. पी. बी. आणि एच. एस. ओ. मुंबईत थिऑसॉफिकल सोसायटीचे मुख्यालय घेऊन आले होते. दामोदर यांनी वेळ न दडवता एच्. पी. बी. आणि त्यांच्या सहकाऱ्यांची अतिशय पूज्यभावाने भेट घेतली. दामोदर यांना समजले की स्वप्नामध्ये त्याचे आयुष्य वाचवणारी व्यक्ती म्हणजे थिऑसॉफिकल सोसायटीच्या स्थापनेमागील प्रेरणा असणाऱ्या महात्म्यांपैकी एक होती. दामोदर लगेचच F. T. S. म्हणजे थिऑसॉफिकल सोसायटीचे सदस्य झाले. १३ जुलै १८७९ ला त्यांनी सदस्यत्वासाठी अर्ज केला आणि ३ ऑगस्टला ते रीतसर सदस्य झाले. तेव्हापासून पुढील ६ वर्षे म्हणजे तिबेटला जाईपर्यंत ते सतत सक्रीय राहिले व सोसायटीच्या कामात अतिशय मोठ्या प्रमाणावर बहुमुल्य योगदान दिले. मुंबईला तात्पुरत्या मुख्यालयात सप्टेंबर १८७९ मध्ये कामाला सुरवात केली. जानेवारी १८८० मध्ये त्याठिकाणी ते कायमस्वरूपी वास्तव्यास आले.

एच. एस. ओ. 'ओल्ड डायरी लीव्हस्' भाग २ मध्ये लिहीतात, "On 3rd August, I took Damodar Mavalankar into membership. It was the rainy season and the dear boy used to come to see us of evenings, clad in a white rubber waterproof and leggings, a cap with flaps to match, a lantern in his hand and the water streaming from the end of his long nose. HPB used to describe his legs as two lead pencils. So far as apperances went he seemed as little likely as any man in the Society to become a Mahatma or get within a thousand miles of a real ashrama. But apperances were as false in this case as they have been in those of other members who seemed infinitely his spiritual superiors, but proved otherwise."

त्याकाळच्या हिंदू संस्कृतीतील सामाजिक परंपरेनुसार दामोदर यांचा विवाह खूप लवकर झाला. दामोदर यांना सोसायटीत येण्याच्या आधीच गुरूदेवांचे दर्शन झाले होते. जेव्हा त्यांनी स्वतःला महात्मा कुथुमी यांचा चेला म्हणून स्वतःला वाहून घेतले तेव्हा त्यांच्या लक्षात आले की कौटुंबिक जबाबदाऱ्या घेणे आता कठीण आहे. गुरूदेवांच्या सेवेसाठी त्यांनी त्यांची

मालमत्ता (रू. ५००००/-), ऐहिक आयुष्यातील उत्कर्ष, कुटुंब, जात या सर्वांवर पाणी सोडले आणि वारसाहक्काने आलेले सर्व काही आपल्या वडिलांकडे सुपूर्त केले पण हे करताना त्यांनी अट घातली की त्यांच्या पत्नीच्या (लक्ष्मीबाई) चरितार्थाची सर्व काळजी घेतली जाईल. आता त्यांनी एच्. पी. बीं. चे कार्य, सोसायटीचे कार्य हे पुजनीय गुरूदेवांचे कार्य मानून स्वतःस पूर्णतः वाहून घेतले.

दामोदर यांचे एक नातेवाईक श्री. एस. एस. शेवडे लिहितात,

"There was only one consideration on which he had to ponder a little, and that was in regard to his young wife married to him in those days of child marriage. For aught I know, he first had a mind to take his wife also with him and did also express a desire of that kind to her; but the young girl, who had hardly reached her teens, was not mentally equipped to fathom the whole situation. Thereupon Damodar assured himself that she would be taken care of by the family members and bade a permanent good-by to his sweet home.

Latterly Damodar was not heard of after his visit to Tibet in search of the Mahatmas, and assuming him to be living, his wife Mrs. Laxmibai Mavalankar led the life of a chaste Saubhagyavati, till she died at about the age of 60."

भारतात आल्यानंतर सुमारे ६ वर्षांनी म्हणजे १८८५ साली दामोदर यांनी गुरूदेवांच्या आश्रमात जाण्यासाठी तिबेटकडे प्रयाण केले. त्याआधीची आपली भूमिका व कार्य अतिशय तन्मयतेने, प्रामाणिकपणे, झोकून देऊन पार पाडली. महात्म्यांनी - ज्यांच्यावर दामोदर यांची अपार श्रद्धा होती - तिबेटमधील आपल्या आश्रमात येण्याची परवानगी दिल्यावर सोसायटीचा रंगमंच सोडून तिबेटकडे गेले. एच्. पी. बी. एका पत्रात लिहितात, "Damodar was ready from his last birth to enter the highest PATH and suspected it. He had long been waiting for the expected permission to go to Tibet before the expiration of the seven years (of probation).'

एच्. एस. ओ. यांचा असा अंदाज होता की दामोदर हे एच्. पी. बी. यांचे थिऑसॉफीचे वारसदार म्हणून परत येतील - दामोदर म्हणून किंवा त्यांचा पुढचा जन्म म्हणून.

त्याकाळात थिऑसॉफिकल नेत्यांभावती एक गूढ वलय होते. त्यांच्या

कृती, कार्य यामागचे उद्देश्य सर्वसामान्यांना पटकन कळत नसत. थिऑसॉफिस्टना आणि या चळवळीला अनेक शत्रूदेखील होते जे यांचा फक्त तिरस्कार करत. या चळवळीबद्दल आणि नेत्यांबद्दल अनेक गैरसमज होते. या आणि अशा अनेक बाबी व प्रश्नांची उत्तरे दामोदर यांनी आपल्या लिखाणातून आणि वागणुकीतून दिली आहेत. महात्म्यांचा आदर्श सच्चा चेला कसा असावा, आध्यात्मिक सद्गुणयुक्त आणि आंतरिक विकास पावलेले जीवन कसे असते याचे एक मुर्तीमंत उदाहरण म्हणजे दामोदर यांचे जीवन होते. आध्यात्मिक मार्गावर (On PATH) प्रवेश करण्यासाठी काय आवश्यक असते हे त्यांच्या जीवनाचा अभ्यास केल्यावर कळते.

अनादि काळापासून महात्मे मानवतेच्या उत्थानासाठी पृथ्वीवर आपले दूत (messengers) पाठवत असतात. एच्. पी. बी., टी. सुब्बाराव, दामोदर यांनी सुद्धा असा महात्म्यांचा दूत म्हणून आपले कर्तव्य बजावले व जगापुढे आध्यात्मिक प्रवासाचे एक आदर्श उदाहरण ठेवले.

एच्. पी. बी., एच. एस. ओ., W. Q. Judge आणि दामोदर हे सोसायटीचे अगदी सुरवातीच्या काळातले शिल्पकार होते. आपल्या सहकाऱ्यांबद्दल अतीव आदर व निष्ठा आणि निःस्वार्थी काम इत्यादि गुणांनी डी. के. ने सर्वांचे मन जिंकून घेतले, सहकारी लोकांनी डी. के. ला भरभरून प्रेम दिले. सोसायटीच्या इतिहासात जी वादळे निर्माण झाली, त्याचा फटका इतर संस्थापकांबरोबर दामोदर यांनाही मोठ्या प्रमाणावर बसला. पण हा कर्माचा भाग समजून दामोदर यांनी अतिशय संयमाने, निग्रहाने, चिकाटीने, सहनशक्तीने हे आघात झेलले.

एच. एस. ओ. लिहितात, "Frail as a girl though he was, he would sit at his table writing, sometimes all night, unless I caught him at it and drove him to bed. No child was ever more obedient to a parent, no foster-son more utterly selfless in his love to a foster-mother, than he to HPB. Her slightest word was to him law; her most fanciful wish an imperative command to obey which he was ready to sacrifice life itlsef."

वीस बावीस वर्षाच्या कोवळ्या वयात दामोदर यांच्यावर खूप काम, खूप जबाबदाऱ्या आल्या पण त्यांनी आपल्या कर्तव्यात कधीही कसूर केली नाही. किंवा त्यांनी कधीही आपल्या कार्यापासून पळ काढला नाही. सोसायटीच्या

प्रकाशन विभागाचे व्यवस्थापक या नात्याने "The Theosophist" या नियतकालिकाच्या कामकाजात त्यांनी मोठी जबाबदारी  सांभाळली. त्यांनी या नियतकालिकासाठी खूप लिखाण केले.

दामोदर "Caste In India" या लेखात लिहितात, "At this time, I had the inestimable good fortune to read Isis Unveiled; a Key to the Mysteries of Ancient and Modern Religion and Science, and to join the Theosophical Society. I have been a really living man only these few months; for beteen life as it appears to me now and life as I comprenended it before, there is an unfathomable abyess. I feel that now for the first time I have a glimpse of what man and life are - the nature and powers fo the one, the possibilites, duties, and joys of the other. Before, though ardently ritualistic, I was not really enjoying happiness and peace of mind. I simply practiced my religion without understanding it. The world bore just hard upon me as upon others and I could get no clear view of the future. The only real thing to me seemed the day's routine. My aspirations were only for more Zamindars, social position and the gratification of whims and appetites.''

दामोदर यांची लवकरच महात्मा कुथुमी यांच्याशी भेट झाली आणि सोसायटी व एच्. पी. बी. यांच्याप्रती त्यांची निष्ठा अधिक दृढ झाली; कुलुपबंद झाली. महात्म्यांच्या या कार्यासाठी त्यांना पारंपारिक हिंदू प्रथेप्रमाणे संन्यास घेणे भाग होते. कुटुंबाने त्यासाठी परवानगी दिली पण दामोदर यांनी त्यापुढे जाऊन आपल्या जातीचा त्याग केला जी त्याकाळी अजिबात सोपी गोष्ट नव्हती. दामोदर यांनी परत जातीत यावे यासाठी त्यांच्यावर खूप दबाव आला. एच. एस. ओ. आणि  एच्. पी. बी. यांनी पण यापासून त्यांना परावृत्त करण्याचा प्रयत्न केला पण दामोदर यांनी निर्णय बदलला नाही. त्यामुळे त्यांचे वडील, काका आणि मोठे बंधू जे सोसायटीचे सदस्य होते, त्यांनी सोसायटीच्या सदस्यत्वाचा राजिनामा दिला आणि ते थिऑसॉफीकल सोसायटीचे उघड उघड शत्रू बनले.

सिलोनच्या दौऱ्यावर असताना १८८० साली एच. एस. ओ., एच. पी. बी. आणि दामोदर यांनी पंचशीलची दिक्षा घेतली. पंचशील म्हणजे (five percepts - compassion, honesty, purity, sincerity, temperance)

दामोदर थिऑसॉफीबद्दल सांगतात, ''Theosophy was not a new

religion in the Pantheon of faiths, but rather an affirmation of the basic unity of all religions, hence Theosophy would make a Christian a better follower of Chirst, a Buddhist a better disciple of Gautama, a Parsi a better Zorostrian and a Hindu a more profound student of the Vedas.''

तब्येतीवर परिणाम होईल इतके दामोदर यांनी स्वतःला कार्यात झोकून दिले पण त्याच बरोबरीने त्यांची आंतरिक प्रगती पण जोमाने होत होती. अनेक आध्यात्मिक क्षमता त्यांनी आत्मसात केल्या. त्यांच्या कठोर तपश्चर्येसाठी त्यांच्या गुरूदेवांनी काही वेळा दामोदर यांची खरडपट्टी काढली. दामोदर यांनी सूक्ष्म स्तरावर (psychically) खूपच जलद गतीने प्रगती केली आणि त्यांना उच्च स्तरावरील अनेक क्षमता प्राप्त झाल्या. त्यामुळे ते आपल्या गुरूंबरोबर सूक्ष्म स्तरावरून संपर्क साधू शकत आणि महात्म्यांची अनेक पत्रे व संदेश दामोदर यांच्यामार्फत सिनेट, ह्यूम आणि इतर अनेक सदस्यांपर्यंत पोहोचत. आजारी रुग्णांवर हीलिंग उपचार करण्याची क्षमता पण त्यांच्यात आली. या सगळ्यामुळे म्हणा किंवा दामोदर यांच्या पूर्वसुकृतामुळे म्हणा, लवकरच गुरूदेवांनी त्यांना आश्रमाला भेट देण्याची परवानगी दिली. दामोदर ॲस्ट्रल देहाने प्रवास करत आश्रमात जात असत. आश्रमातून किंवा गुरूदेव जेथे असतील तेथून पत्र, संदेश घेऊन तो योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यासाठी दामोदर आपल्या सूक्ष्म देहाचा वापर करू लागले.

एच. एस. ओ. 'ओल्ड डायरी लीव्हस्' भाग ३ मध्ये लिहीतात, ''On putting his body to sleep as usual, Damodar made a dash for the home of the Master among the Himalayas, but found, on arriving, that he (Master) too was away in the astral body; and by the power of his attraction for his pupil, the latter was swept away as powerfully and instantenously as though he had ventured into a deep and inpetuous river current and been carried off his footing. The next minute Damodar found himself at Adyar, in the presence of both his Master and HPB. On going to sleep he had held Mr. Wald's letter in his hand, and it had, it seems, gone along with him on astral plane - itself, of course, changed from ponderable into astral, or etheric matter. On telling the Master about the letter, he perceived it in his hand, gave it over to him and was bidden to return to his place. By the radical power of the occult chemistry or physics, the astralised letter was restored to it solid state, taken by

HPB and the next day duly posted to destination.''

१८८३ साली दामोदर यांची त्यांच्या गुरूदेवांशी (महात्मा कुथुमी) प्रत्यक्ष भेट लाहोर येथे झाली. त्यावेळेस डी. के. आणि एच. एस. ओ. काही काळ जम्मू-काश्मिर येथे काश्मिरच्या राजाचे पाहूणे म्हणून राहिले. याकाळात एच. एस. ओ. यांना काहीही न सांगता दामोदर अचानक गायब झाले पण याची कल्पना एच्. पी. बी. यांना अड्यार येथे होती. त्यांनी अड्यार येथून तार केली की दामोदर त्यांच्या गुरूदेवांच्या रीट्रीटला गेला आहे आणि तो लवकरच परत येईल. तीन दिवसांनी दामोदर परत आले तेव्हा त्यांचे व्यक्तिमत्व संपूर्ण बदलले होते. ते जास्त कणखर, धीट, robust, strong झाले होते. त्यांच्यात उर्जा सळसळत होती. आधीचे दामोदर ते हेच यावर विश्वास बसणार नाही इतका त्यांच्यात बदल झाला होता.

१८८४ च्या कोलंब प्रकरणाचा महात्म्याच्या या अतिशय उत्साही चेल्याच्या कार्यावर खूप विपरित परिणाम झाला. कोलंब प्रकरण, हॉगसन रिपोर्ट हे सगळे होत असताना एच्. पी. बी. आणि एच. एस. ओ. युरोपमध्ये होते आणि दामोदर अड्यार येथे होते. या गंभीर प्रकराणाबद्दल दामोदर वेळोवेळी म्हणजे जवळजवळ प्रत्येक आठवड्याला संस्थापकांना पत्र पाठवत होते, अड्यार येथे काय चालू आहे ते कळकळीने सांगत होते. पण दुर्दैवाने संस्थापकांना परिस्थितचे गांभीर्य लक्षात आले नाही. त्यांना वाटायचे की अड्यारला परत गेल्यावर बोलून, समजावून, प्रेमाच्या ४ शब्दांनी परिस्थिती पूर्ववत होईल. त्यामुळे संस्थापकांनी दामोदर यांची पत्रे फारशा गांभीर्याने घेतली नाहीत. यामुळे दामोदर अतिशय निराश झाले आणि त्यांनी संस्थापक कोलंब दांपत्याबद्दल घेत असलेल्या मवाळ भूमिकेबाबत कडवट, तिखट तक्रार केली. याकाळात अड्यार येथे अशी परिस्थिती निर्माण झाली की हार्टमन वगैरे मंडळी आणि दामोदर यांच्यात गैरसमजूती वाढीस लागल्या. डॉ. हार्टमन यांच्याकडे अड्यार मुख्यालयाची महत्वाची कागदपत्रे इत्यादिच्या व्यवस्थापनाची जबाबदारी होती. दामोदर यांचा मितभाषीपणा अड्यार येथील अनेकांना पसंत नव्हता, योग्य वाटत नव्हता. कोलंब प्रकरणाचा तपास करायला आलेल्या रिचर्ड हॉगसन यांनी एस. पी. आर. च्या रिपोर्टमध्ये जे काही ताशेरे ओढले त्याला काही प्रमाणात दामोदर जबाबदार आहेत असे त्यावेळेस अनेकांचे मत होते. या सगळ्यामुळे दामोदरच्या तब्येतीवर मोठी परिणाम झाला. त्यांच्या

क्षयाने परत डोके वर काढले, त्यांच्या तोंडातून रक्त पडत असे.

दामोदर यांनी तिबेट येथील आश्रमात जाण्यासाठी आपल्या गुरूदेवांची परवानगी मिळवली. डी. के. यांनी २३/०२/१८८५ ला तिबेट सीमेवर जाण्यासाठी अड्यार सोडले. कलकत्तामार्गे ते बनारसला गेले. तेथे ते १४ दिवस राहिले. तेथे त्यांची भगवानदास या तरूण थिऑसॉफीस्टची भेट झाली. (आपल्याला माहितच आहे की भगवानदास यांनी नंतरच्या काळात शिक्षणक्षेत्रात विशेष आणि महत्वपूर्ण योगदान दिले.) पुढे १९४५ साली भगवानदास एका पत्रात लिहितात, ''I have already read more than half of 'Damodar'. Whenever I take it up, it sends me back 60 years in memory; and the 'mystic romance' of those 'young days' becomes renewed for the time being. In my $17^{th}$ year, 2 years after i joined TS, I saw Damodar for a few days during 1885, when he halted in Beneras for about a fortnignt. on his way to the Himalayas. He was a small thin young man, with an ascetic face, exaltation of high aspiration written on his face. He used to wear a cap of dark brown fur, very soft and long, which, he told us had been given to him by the Master KH.

He looked between 20 and 30 in 1885. If he is living now - as he may very well be - for even ordinary chlean-living theosophists often reach 80 or 90, and accepted chelas may well live much longer - he would be about 90. He may come to India even yet!''

(क्रमशः)

---

## कर्मफल–चिंतन

प्रसंग १) समजा व्यक्ती 'अ' तीव्र तिरस्कारापोटी व्यक्ती 'ब' च्या पोटात सुरा खुपसते.

प्रसंग २) समजा डॉक्टर 'क' आतड्याची शस्त्रक्रिया करताना व्यक्ती 'ब' च्या पोटावर कात्री चालवतो.

दोन्ही प्रसंगात प्रत्यक्ष कृती साधारणपणे एकच आहे पण या समान कृतीचे व्यक्ती 'अ' ला आणि डॉक्टर 'क' ला मिळणारे फळ पूर्णतः निराळे असेल कारण 'अ' आणि 'क' चे उद्देश व हेतू एकमेकांपेक्षा वेगळे आहेत.

# जागृति, स्वप्न, सुषुप्ति व तुरिया

ले. – कै. राजाराम सखाराम भागवत, एम्. ए., ठाणे.

(पुर्नमुद्रित लेख)

वेदान्ताच्या वाङ्मयामध्ये जागृति, स्वप्न, सुषुप्ति व तुरिया या जीवाच्या चार अवस्था वर्णिलेल्या आहेत. या अवस्था मूळ कोणत्याही कारणाकरिता सांगण्यात आलेल्या असोत, आज प्रचलित असलेल्या वेदान्तांत प्रायः आत्म्याचा विचार करताना त्या येतात, व आत्मा ह्या सर्व अवस्थांच्या पलिकडे आहे, त्या अवस्था नाहीशा झाल्या तरी आत्मा कायम राहातो ही गोष्ट स्पष्ट करण्याकरिता त्यांचा संबंध येतो. अवस्था येतात आणि जातात, पण प्राणिमात्रांमध्ये असणारी आत्मस्वरूपाची दर्शक जी 'मी आहे' ही भावना ती तशीच अढळ रहाते; तेव्हा या सर्व अवस्था अनित्य आहेत, त्यांस महत्व देण्यात अर्थ नाही, अवस्थांच्या मायेतून बाहेर पडून प्रत्येकाने अवस्थातीत असलेल्या आत्म्याकडे लक्ष दिले पाहिजे असे वेदान्ताचे म्हणणे आहे. या म्हणण्याच्या पुष्टीकरणार्थच या अवस्थांचा विचार करण्याचा हल्लीच्या वेदान्त्यांचा संप्रदाय दिसतो. अर्थात् त्यांच्याकडे स्वतंत्रपणे पुरेसे लक्ष दिले जात नाही. याचा परिणाम असा झाला आहे की, आकलन करण्यास अतिशय कठीण असे जे आत्म्याचे स्वरूप ते तर जिज्ञासूस समजत नाहीच, पण विवेचनास साधन म्हणून ज्या या अवस्था घेतलेल्या असतात त्यांकडेही दुर्लक्ष होऊन त्यांच्या स्वरूपांविषयी मात्र भलत्या समजुती लोकात प्रचलित होतात.

## प्रचलित समजुती

हल्ली लोकांची अशी समजूत झाली आहे की, आपली नेहेमीची स्थिती ती 'जागृतावस्था' होय; मनुष्यास झोप लागली व तीत स्वप्ने पडू लागली म्हणजे ती स्थिती 'स्वप्न' होय; स्वप्न ज्या झोपेत पडत नाही ती गाढ झोप 'सुषुप्ति' होय; या सुषुप्तीच्या पलीकडे एक अवस्था आहे. ती आणखी एक – चवथी – (संस्कृत भाषेत 'तुर्या') अवस्था होय. यापैकी कोणत्याही एका अवस्थेत असताना दुसरी अवस्था नाहीशी होते व खोटी वाटते. स्वप्ने पडत असताना ती खरी वाटतात; मग ती कितीही असंभाव्य असोत; पण जागेपणी खोटी वाटतात. स्वप्नात जागेपणचे अनुभव नाहीसे होतात व जागेपणी सत्य

असत्य वाटते. जागेपणी जो बिछाना डोळ्यांस सत्य वाटत होता त्यावर झोपी गेलेला मनुष्य स्वप्नात आपण विमानात उडत आहो असे मानील व आपण बिछान्यात निजलो आहो ही गोष्ट विसरेल. स्वप्नात दिसणाऱ्या खोट्या भीतीस तो खरोखरी भिईल. झोप अधिक लागली व तीत स्वप्ने पडण्याचे बंद झाले म्हणजे मनुष्यास जागृति किंवा स्वप्न या दोन्ही स्थितीचा अनुभव येण्याचे बंद होते व त्या स्थितीत त्यास काहीच समजत नसल्यामुळे अज्ञानाचाच काय तो अनुभव घेतो. म्हणजे जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीन स्थितींपैकी प्रत्येकीचा अनुभव अशाश्वत असतो. प्रत्येक स्थितीत जोवर मनुष्य आहे, तोवर ती त्यास खरी वाटते, पण तीतून निघून तो दुसरीत आला म्हणजे तोच अनुभव त्यास खोटा असल्याची खात्री होते. जो अनुभव एकदा खरा व एकदा खोटा असा वाटतो त्यास अक्षय, कायमचा टिकणारा किंवा वेदान्ताच्या परिभाषेत 'सत्य' असे विशेषण देणे बरोबर नाही. या सर्व अवस्थांत 'मी आहे' अशी जी अस्तित्ववाचक भावना एकसारखी कायम असते तीच 'सत्य' होय व तीच आत्मा होय.

## आक्षेप

सांप्रतकाळच्या वेदान्त्यांच्या या विचारसरणीत बरेचसे तथ्य आहे; पण तीत दोषही पुष्कळ आहेत. प्रस्तुत विषयाच्या दृष्टीने पाहिले तर जागृति, स्वप्न, सुषुप्ति व तुर्या या अवस्थांसंबंधाने या विचारसरणीपासून फारच गैरसमज उत्पन्न झाले आहेत हा त्यातील प्रमुख दोष होय. तसेच ती दिसते तितकी बरोबरही नाही. जागृतावस्थेत स्वप्ने खोटी वाटतात हे म्हणणे तात्त्विक दृष्ट्या खोटे आहे. आजचा अर्धवट शिकलेला वेदान्ती सांगतो त्याप्रमाणे जर एका अवस्थेत दुसरीचा 'बाध' होत असता किंवा दुसऱ्या शब्दांनी सांगावयाचे म्हटले तर, जर एका अवस्थेत दुसरीतील अनुभव लुप्त होत असता तर कोणतेही स्वप्न जागृतावस्थेत खरे ठरते ना. पण अनुभव उलट आहे. काही स्वप्ने खरी ठरतात अशी प्रचीति आहे. Psychical Research म्हणून जे संशोधन अलिकडे युरोपात चालू आहे ते पाहता स्वप्ने खरी झाल्याची पुष्कळ विश्वसनीय उदाहरणे उपलब्ध आहेत असे निःसंशयपणे म्हणता येईल. यावरून स्वप्नात जागृतीचा नेहेमीच बाध होतो हे म्हणणे संयुक्तिक दिसत नाही. इतकेच नव्हे तर कित्येक वेळा स्वप्नातील अनुभव जागृतीच्या अनुभवांचे पोषक आहेत,

अर्थात ते दोन्हीही खरे असले पाहिजेत असे होते. स्वप्न व गाढ झोप या निराळ्या अवस्था आहेत असे जे वेदान्ती धरून चालले आहेत त्याही मतावर नवीन शोधांनी आघात केलेला आहे. गाढ झोपेत असताना माणसास बोलते करण्याची युक्ति मानसशास्त्रवेत्त्यास सापडल्यापासून, त्या गाढ स्थितीतही माणसास स्वप्ने पडत असतात, फक्त जागेपणी त्यांची त्यास आठवण रहात नाही असे ठरल्यासारखे दिसत आहे. याचा अर्थ असा होतो की, सुषुप्ति (आजचे वेदान्ती गाढ झोप म्हणतात ती) व जिची आठवण बुजली आहे अशी फार वर्षांपूर्वीची जागृतावस्था या दोन्ही निराळ्या जातींच्या अवस्था आहेत असे मानण्याचे कारणच उरत नाही.

अधिकारयुक्त वाणीने वेदान्तावर लिहिणारे ग्रंथकार अशा प्रकारच्या चुका करतील असे संभवत नाही. थिऑसॉफिकल सोसायटीतील काही माणसांनी 'योग' शिकून या अवस्थासंबंधाने सप्रयोग शोध केलेले आहेत. ते पाहिले असता या घोटाळ्यांचा उलगडा होतो व या प्रकरणी ज्या चुका झाल्या आहेत त्या मूळ ग्रंथाच्या नसून, आज व्याकरणशास्त्राच्या जोरावर त्यांचा अर्थ करणाऱ्या अननुभवी टीकाकारांच्या आहेत असे दिसून येते. वेदान्ताचा व योगाचा विचार करणाऱ्या माणसास या अवस्थांचे यथार्थ ज्ञान होणे जरूर आहे. एरवी जीवाच्या उत्क्रांतीचे व मनुष्याच्या स्वरूपाचे आकलन त्यास करता येणार नाही व धर्माच्या मूळ तत्त्वसंबंधाने त्याच्या मनात भलते ग्रह बसून राहतील.

योगविद्यापारंगत माणसास असे आढळून येते की, जागृति, स्वप्न, सुषुप्ति व तुर्या या विषयांचे हल्लीच्या वेदान्त्यांचे विवेचन साफ चुकलेले आहे. मोक्षस्थितीच्या अगदी जवळ जाताना जरी त्या सर्व अवस्थांच्या पलिकडे जाणे माणसास जरूर असले व त्या पलिकडल्या स्थितीच्या मानाने त्या अवस्था अज्ञानमय असल्या तरी सामान्य दर्जाच्या जिज्ञासूस त्या ज्ञान देणाऱ्या अतःएव महत्वाच्या आहेत व हे ओळखून त्यांच्यातूनच त्यास आपली वाट काढावयाची असते.

## मनुष्याची रचना

मनुष्याची रचना साधी नाही – भानगडीची आहे. तलावात वाढून वर आलेल्या झाडाची मुळे जमिनीत असतात, त्याचा मध्यभाग पाण्यात असतो,

त्याचा शेंडा हवेत असतो. माणसाचा प्रकार बहुतांशी अशा झाडासारखा आहे. या झाडाच्या शेंड्याची हवेतील अवस्था, त्याच्या मध्याची पाण्यातील अवस्था व त्याच्या मुळांची जमिनीतील अवस्था या निरनिराळ्या आहेत. हवेत उडणाऱ्या भृंगास त्याची एक अवस्था दिसते. पाण्यात पोहणाऱ्या माशास त्याची दुसरी अवस्था दिसते व जमिनीत घर करणाऱ्या कीटकास त्याची तिसरी अवस्था दिसते, पण झाड एकच आहे व एकच जीव त्याच्या सर्वांगात पसरला आहे. हवेच्या मंद लहरीवर आंदोलणारे पुष्पफलयुक्त झाडाचे उत्तमांग, पाण्याच्या शीतल स्पर्शाने आर्द्र झालेले वल्कलावगुंठित मध्यमांग व भूमातेस आपल्या करपल्लवांनी घट्ट धरणारे कनिष्ठांग ही निरनिराळ्या अवस्थेत आहेत. झाडाची जाणीव, त्याचा जीव, शिखरांतून आविष्कृत होऊन रविकिरणांच्या तेजाने न्हाईल, खोडातून वरुणाच्या राज्यातील नागरिकांशी आपला स्नेहसंबंध जोडील व मुळातून गंधवती जी पृथ्वी तिचा आस्वाद घेईल. हे तीन प्रकारचे अनुभव झाडाच्या एका जीवास येतील. घन जमीन, प्रवाही पाणी व वायुरूप हवा या तीन प्रकारच्या द्रव्यांची तीन निरनिराळी वेष्टणे झाडाच्या तीन भागास आहेत व त्यामुळे त्या अवस्था शक्य झाल्या आहेत.

मनुष्याचे असेच आहे. झाडाच्या भोवती जसे घन, प्रवाही व वायुरूप असे निरनिराळ्या प्रकारचे द्रव्य आहे त्याप्रमाणे मनुष्यही निरनिराळ्या जातीच्या द्रव्यांनी परिवेष्टित आहे. आपल्या सभोथनी पाहिले तर एकाहून एक विरळ अशा निरनिराळ्या प्रकारच्या द्रव्यांनी सर्व विश्व भरलेले आहे असे दिसते. माती, दगड, खनिजद्रव्ये, लाकूड हे आपल्या सभोवतालच्या दृश्य द्रव्यातील सर्वात कठीण व घन पदार्थ होत. पाण्यासारखे प्रवाही पदार्थ हे त्याहून विरळ व मऊ होत. त्यापेक्षा अधिक विरळ म्हणजे हवेसारखे ऑक्सिजन, नायट्रोजन वगैरे वायुरूप पदार्थ होत. त्याहीपेक्षा विरळ पदार्थ म्हटला म्हणजे आधुनिक शास्त्रज्ञांनी मानलेला ईथर हा होय. हा हवेपेक्षा पुष्कळ पातळ किंवा विरळ असून आपणा सभोवती सर्वत्र पसरून राहिलेला आहे. ईथरपेक्षा अधिक विरळ पदार्थांचा शास्त्रज्ञांना अद्याप शोध लागलेला नाही. पण योगमार्गाने ज्यांनी संशोधन केले आहे त्यांच्या अनुभवास असे आहे आहे की, या विश्वात एकापेक्षा एक विरळ अशा द्रव्यांची लांबच लांब परंपरा आहे. ज्या द्रव्यास शास्त्रज्ञ ईथर म्हणतात त्यापेक्षा कितीतरी प्रकारच्या एकाहून एक विरळ अशा महाभूतांनी जग भरलेले आहे. ही द्रव्ये विरळ असल्यामुळे हवा किंवा

ईथरप्रमाणे ती माणसास अदृश्य होतात; व विरळ असल्यामुळेच ती वाफ व हवा यांच्याप्रमाणे आपणाभोवती एकत्र सरमिसळ राहू शकतात.

जगात ही जी अनेक प्रकारची द्रव्ये आहेत त्यांचे विचाराच्या सोयीसाठी भाग पाडण्यात आले आहेत. सर्वात जे घन द्रव्य आहे तो पहिला भाग होय. त्यास आपण पार्थिव द्रव्य किंवा 'भूद्रव्य' असे म्हणू या. या भागात जमीन, पाणी यासारखी दृश्य व ईथर सारखी काही मर्यादेपर्यंतची अदृश्य द्रव्ये येतात. सर्व भूलोक याच द्रव्यांचा बनला आहे. यापेक्षा विरळ अशी पुष्कळ द्रव्ये आहेत. त्यापैकी भूद्रव्यापेक्षा विरळ असणारे द्रव्य दुसऱ्या भागात मोडते. ते हवा किंवा ईथर यापेक्षाही विरळ असल्यामुळे अर्थात दृष्टिगोचर होत नाही. या द्रव्यास आपण 'भुवर-द्रव्य' असे नाव देऊ. जसे भुद्रव्याचेही अनेक पोटभाग आहेत तसेच भुवरद्रव्याचेही अनेक पोटभाग आहेत. ज्यास संस्कृत ग्रंथात भुवर्लोक म्हणतात तो या द्रव्याचा बनलेला आहे. त्याहीपेक्षा जो आणखी विरळ द्रव्याचा भाग तो तिसरा भाग होय. त्याचेही अनेक पोटविभाग आहेत. हे स्वर्लोकाचे द्रव्य होय. तेव्हा अपण त्यास 'स्वर-द्रव्य' असे म्हणू. असेच पुढे गेले तर आणखीही विरळ द्रव्ये सापडतात. ती महर्लोक, जनोलोक इत्यादिकांची द्रव्ये आहेत. हवा आणि ईथर ही जशी आपल्या भोवती पसरून आहेत त्याचप्रमाणे एकापेक्षा एक विरळ असणारी ही द्रव्ये - ज्यास आपण भुवरद्रव्य, स्वरद्रव्य इत्यादि नावे आताच दिली आहेत तीही आपणाभोवतीच भरून राहिलेली आहेत. विरल असल्यामुळे ती आपल्या कोत्या शक्तीच्या ज्ञानेंद्रियांस समजून येत नाहीत इतकेच. सारांश, मनुष्य हा दृश्य व अदृश्य अशा द्रव्याच्या समुद्रात पोहत आहे. या द्रव्यांपैकी काही द्रव्यांचा भूलोक बनला आहे, याहून विरल द्रव्याचा भुवर्लोक बनला आहे व त्याहून विरल द्रव्याचा स्वर्लोक बनला आहे. असेच पुढील लोकांचे आहे.

## जाणीवेच्या अवस्था

वर वर्ण केलेल्या झाडास जसा जमीन या द्रव्यात एक प्रकारचा अनुभव येतो, पाणी ह्या त्याहून पातळ असणाऱ्या द्रव्यात दुसऱ्या प्रकारचा अनुभव येतो व हवा या सर्वात पातळ द्रव्यात तिसऱ्याच प्रकारचा अनुभव येतो तसेच माणसाचे होते. भूलोक, भुवर्लोक, स्वर्लोक इत्यादिकांची द्रव्ये माणसांभोवती पसरलेली आहेत व प्रत्येक लोकाच्या द्रव्यापासून त्यास निरनिराळ्या जातीचा

अनुभव येतो. हे जे अनेक प्रकारचे अनुभव त्याच जागृति, स्वप्न, सुषुप्ती इत्यादिक अवस्था होत. या भूलोकाच्या द्रव्यापासून मिळणारा अनुभव मनुष्यास ज्या अवस्थेत येतो ती जागृतावस्था होय. भुवर्लोकच्या द्रव्यापासून मनुष्यास ज्या स्थितीत अनुभव येतो ती स्वप्न ही अवस्था होय. त्याच्या पुढील द्रव्याचा अनुभव सुषुप्तीत येतो. स्वप्नस्थिती म्हणजे आपणास पडणारी स्वप्ने नव्हेत, व सुषुप्ति म्हणजे पुष्कळ शारीरिक मेहनत केल्यावर येणारी गाढ झोप नव्हे. स्पप्न, सुषुप्ति व तुर्या हे पारिभाषिक शब्द आहेत. झाडास हवेतील अनुभव घेण्यास साधन म्हणून श्वासेंद्रियप्रचुर पाने असतात व जमिनीत अन्नरस शोषण्यास उपयोगी अशी मुळे असतात. त्याच प्रकारे मनुष्यास भुवर्लोक, स्वर्गलोक वगैरे एकाहून एक विरळ द्रव्याच्या बनलेल्या लोकातील अनुभव घेण्यास व त्या लोकात व्यवहार करण्यास साधने असतात. त्यासच मनोमय कोष, विज्ञानमय कोष अशी वेदान्तात नावे आहेत. हे कोष प्रत्येक माणसाच्या सभोवती असतात व जसे आपले दृश्य शरीर या लोकीच्या व्यवहारास साधन होते, तसेच हे कोष इतर लोकात उपयोगी पडतात. एवंच दृश्य देहाने या लोकात मनुष्याचा जो व्यवहार होतो ती जागृतावस्था होय व मनोमयादि कोषांनी भुवर्लोक, स्वर्गलोक इत्यादिक लोकात जे व्यवहार होतात त्याच स्वप्न, सुषुप्ति वगैरे अवस्था होत.

★★★

One of the most striking advantages of Theosophy is that the light which it brings to us at once solves many of our problems, clears away many difficulties, accounts for the apparent injustices of life, and in all directions brings order out of seeming chaos.

- C. W. Leadbeater

To understand the Divine Plan which is the power behind evolution, and to hasten the realization of that Plan are the two main objectives of Theosophists.

- C. Jinrajadasa

# ॲनी बेझंट यांचा म.थि.फे. ला संदेश

**अनुवाद – कै. र. गं. भडभडे, पुणे.**

थिऑसॉफिकल सोसायटीच्या तत्कालीन अध्यक्षा डॉ. ॲनी बेझंट यांनी ३० ऑगस्ट १९१३ रोजी मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनने नव्याने सुरु केलेल्या मासिकासाठी शुभेच्छा-संदेश अड्यार, चेन्नई येथून स्वतःच्या हस्ताक्षरात पाठविला होता. त्यात त्यांनी सुचवले होते की ह्याचे मराठी भाषांतर करून ते छापावे. येथे त्या पत्राचे मराठी भाषांतर देत आहोत.

थिऑसॉफिकल सोसायटीच्या प्रगतीच्या अनेक लक्षणांपैकी एक आहे, तिचे नित्य विस्तारणारे वाङ्मय. त्यासाठी मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनच्या नवीन मासिकाचे मी सहर्ष स्वागत करते. ते स्थानिक मराठी भाषेत प्रसिद्ध होणार आहे हे विशेष आंनदाचे आहे. आई जी भाषा बोलत बाळाला कुरवाळते, गोंजारते, ती भाषा नेहमीच माणसाच्या हृदयाला भिडते आणि मातृभाषेचा साज चढवून प्रज्ञान सांगितले जाते तेव्हा त्याहून प्रभावी अन्य काही नसते.

याशिवाय महाराष्ट्रात वैभवशाली धार्मिक परंपरा आहे व ज्या भाषेमध्ये असे (उच्च) दर्जेदार वाङ्मय आहे त्या भाषेचा आदर आणि रक्षण केले पाहीजे. महाराष्ट्रातील महान संत जागतिक महत्वाचे आचार्य (teachers) आहेत. जगाच्या लाभासाठी त्यांच्या शिकवणीचे (teachings) भाषांतर केले जावे. परंतु त्याचबरोबर ज्या भाषेमध्ये त्यांचा प्रथम उद्घोष झाला, त्या भाषेत ते अजरामर झाले पाहिजे.

बंधूनो, ते वैभवशाली साहित्य क्षेत्र तुमच्यासमोर कार्यासाठी खुले आहे. ज्या लोकांमध्ये नियतीने तुम्हाला जन्माला घातले आहे, त्या महाराष्ट्रीय लोकांपेक्षा अधिक तल्लख मेंदूचे भारतामध्ये दुसरे कोणी नाहीत. त्यांच्याहून अधिक पौरुषयुक्त (virile) अन्य मानव-वंश (race) नाही. तुम्ही मर्द माणसे जमवा, दुबळी नकोत. महात्म्यांच्या आशीर्वादानी बलवान व्हा, ज्ञानप्रकाश मिळवा आणि प्राप्त झालेल्या या अजोड संधीचा उत्तम व पुरेपूर सदुपयोग करा.

**-- ॲनी बेझंट**

थिऑसॉफिकल सोसायटी,

अड्यार, मद्रास. ऑगस्ट ३०, १९१३

# लॉज वार्ता

**◆ दी अकोला थिऑसॉफिकल लॉज, अकोला –**

अकोला लॉजच्या वतीने आयोजित 'प्रकाशपर्व स्नेहसंमेलन' कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय दळवी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रबोध देशपांडे – विशेष संपादक, दै. लोकसत्ता, डॉ. प्रिती माथने – अध्यक्ष अकोला लॉज, डॉ. ए. एस. सोनोने व रणजित पवार – सचिव, अकोला लॉज तसेच ज्येष्ठ आणि नवीन सभासद बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रणजित पवार यांनी केले. एकूण उपस्थिती ४४ होती.

**◆ दी आनंद थिऑसॉफिकल लॉज, खामगाव –**

दि. २३/१०/२०१९ रोजी संध्याकाळी आनंद लॉजची सभा घेण्यात आली. या सभेत म. थि. फे. च्या ८८ व्या वार्षिक अधिवेशन पुर्णत्वाला नेण्यात लॉजच्या सभासदांनी जे सहकार्य केले, श्रमदान केले, परिश्रम घेतले, जे सर्व कौतुकास पात्र आहेत त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप आणि त्यांना प्रोत्साहन म्हणून आनंद थिऑसॉफिकल लॉजतर्फे सभासदांचा स्मृतिचिन्ह व दिवाळीनिमित्त मिठाई देऊन गौरव करून त्या सर्वांचे आभार मानण्यात आले.

**◆ धंतोली लॉज, नागपूर –**

धंतोली लॉज, नागपूर येथे दिनांक ८ ते १० नोव्हेंबर २०१९ या कालावधीत अभ्यासवर्ग संपन्न झाला. विषयसूत्र 'Masters & The Path' हे होते. ह्या अभ्यासवर्गात बंधु प्रदीप महापात्रा, माजी उपमहासचिव, इंडियन सेक्शन, वाराणसी आणि भगिनी मितालीनी महापात्रा यांनी बहुमुल्य मार्गदर्शन केले.

**◆ दी पूना लॉज, पुणे –**

१) दी पूना लॉजची वार्षिक सर्वसाधारण सभा ३० जून २०१९ ला लॉज हॉलमध्ये संपन्न झाली. पुढील २ वर्षांसाठी एकमुखाने निवडण्यात आलेले पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य पुढीलप्रमाणे –

ॲड. संजय दि. पोटे – अध्यक्ष, बंधु सिनारे एम. ए. – उपाध्यक्ष

बंधु कौस्तुभ भडभडे – कोषाध्यक्ष, भगिनी नीला अभ्यंकर – सचिव

**कार्यकारिणी सदस्य** – बंधु शरद वैद्य, बंधु श्रीधर रायरीकर, बंधु पालकृत अरूण, भगिनी वर्षा मोटवानी, भगिनी रेणू तुला, बंधु डी. एस. करमरकर, भगिनी माया जाधव.

२) नेहमीप्रमाणे प्रत्येक रविवारी सकाळी ९.३० ला भारत समाज पूजा तर त्यानंतर एका धर्माची प्रार्थना व ओंकार उच्चारण झाले. त्यानंतर व्याधीनिवारण विधी झाला.

३) महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या रविवारी 'Thought Power - It's control and culture' या ॲनी बेझंट यांच्या पुस्तकाचे अध्ययन झाले तर दुसऱ्या रविवारी बंधु शरद वैद्य यांनी 'Theosophy Science Meet' घेतली. बंधु नितीन अभ्यंकर सध्या प्रत्येक चवथ्या रविवारी ''दामोदर व थिऑसॉफिकल चळवळ'' या विषयावर व्याख्यानमाला घेतात. याची ३ सत्रे झाली आहेत.

४) दर मंगळवारी व शुक्रवारी बंधु शशांक बुरसे यांच्या मार्गदर्शनाखाली दुपारी ४ ते ५ या वेळेत 'The Secret Doctrine' या ग्रंथाचे तर ५ ते ६ यावेळेत 'The Mahatma Letters' या ग्रंथाचे अध्ययन केले जाते.

५) रोज ४ ते ६ लॉजचे ग्रंथालय चालू असते. लॉजमध्ये थिऑसॉफीवरील मराठी व इंग्रजी पुस्तके विक्रीला उपलब्ध आहेत. या दोन्हीची जबाबदारी सध्या बंधु गांधी आणि भगिनी माया जाधव पहातात.

◆ **दी सांगली लॉज, पुणे** –

रविवार २०/१०/२०१९ रोजी डॉ. ऋता कुलकर्णी यांचे 'ओंकार साधना' या विषयावर व्याख्यान झाले. श्री. व सौ. जे. एस. पाटील यांनी थिऑसॉफीकरता दिलेल्या देणगीबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

★★★

---

**स्वतःची बाह्यरंग परिस्थिती – जी फक्त एक साधन आहे – त्यात गुंतून न राहता स्वतःच्या अंतरंगात खोल खोल जाणे म्हणजेच अध्यात्म असे म्हणता येईल.**

# दी थिऑसॉफिकल सोसायटी

मुख्य कार्यालय : अड्यार (चेन्नई) ६०० ०२०.
e-mail : secy.hq@ts-adyar.org
website : www.ts-adyar.org

**आंतरराष्ट्रीय अध्यक्ष** : बंधु टीम बॉईड, अड्यार, चेन्नई.

**भारतीय शाखा**

**कार्यालय** : थिऑसॉफिकल सोसायटी, कामाच्छा, वाराणसी – २२१ ०१०.
फोन : (०५४२) २४५०७७६, २४००७७३
e-mail : theosophyvns@gmail.co
website : www.theosophy-india.org

**महासचिव** : श्री. प्रदिप गोहील **कोषाध्यक्ष** : बंधु व्ही. नारायणन

**मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनची कार्यकारिणी**

**अध्यक्ष** : ॲड. संजय दि. पोटे
२, चिंतामणी अपार्टमेंटस्, प्लॉट नं ७२, उजवी भुसारी कॉलनी,
कोथरूड, पुणे ४४००१०. मोबाईल नं. : ७७४४९१०७८७

**उपाध्यक्ष** : बंधु रामन्ना सी. माळी
सांगली ४११००४. मो. नं. : ९९२२२३१७८८

**सचिव** : बंधु अरूण मा. पालकृत
इंद्रप्रस्थ, ए१/११, साई चौकाजवळ, न्यू सांगवी, पुणे ४११०६१.
फोन : ९४२२०३६७०२

**कोषाध्यक्ष** : बंधु कौस्तुभ भडभडे
पुणे ४११००४. मो. नं.: ९६२३४४८२४३

**उपसचिव** : भगिनी प्रवीणा शाह, खामगाव.

**कार्यकारिणी सदस्य** : बंधु जे. के. जाधव बेळगाव, बंधु डी. एस. कारखानीस सांगली, बंधु ए. पी. लोखंडे नागपूर, बंधु एस. के. विसाळ मालेगाव, भगिनी एस. एन. मेहेत्रे नागपूर, बंधु ॲड. एन. डी. राऊत अमरावती, बंधु डॉ. ए. एस. सोनोने अकोला, बंधु एन. एन. राऊत अकोला, बंधु प्रा. एन. डी. अभ्यंकर पुणे (आमंत्रित), बंधु प्रा. सी. ए . शिंदे अड्यार, चेन्नई (इंडियन कॉन्सिल रिप्रेझेंटेटिव्ह.)

**विश्वबंधुत्व संपादक मंडळ** : बंधु नितीन अभ्यंकर, बंधु शशांक बुरसे,
बंधु ए. एस. सोनोने, भगिनी नीला अभ्यंकर.

**फेडरेशन कार्यालय : मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन**

द्वारा : पूना लॉज, ९१८ शिवाजीनगर, गणेशवाडी, बी.एम्.सी.सी.रोड, पुणे ४११ ००४.
फोन : ०२०-५६७ ०४१८

# थिऑसॉफिकल सोसायटी

## तीन उद्दिष्टे

१. जात, धर्म, लिंग व वर्ण हे भेद न करता मानवजातीच्या विश्वबंधुत्वाचे जिवंत केंद्र बनविणे.

२. तौलनिक धर्म, तत्वज्ञान, विज्ञान यांच्या अध्ययनास उत्तेजन देणे.

३. अनाकलनीय सृष्टिनियम व मानवातील सुप्त शक्तींचे संशोधन करणे.

## तीन महान सत्ये

१. माणसाचा आत्मा अमर आहे, त्याच्या विकासाला आणि वैभवाला सीमा नाही.

२. जे तत्व जीवन देते, ते आपल्या आत तसेच बाहेरही वास करते. ते अमर व सदा कल्याणकारी आहे. ते ना ऐकू येते, ना दिसते, ना हुंगता येते; पण ते जाणण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या मनुष्याला अनुभवगम्य आहे.

३. प्रत्येक माणूस स्वत:च स्वत:चा एकमेव शास्ता आहे. स्वत:ला प्रकाशात किंवा अंध:कारात ठेवणारा तोच, जीवन, पुरस्कार, शिक्षा हे त्याचे हुकुम.

## विचार स्वातंत्र्य

थिऑसॉफिकल सोसायटी जगात दूरदूर फोफावली आहे. सर्व धर्मांचे अनुयायी, आपआपले धार्मिक सिद्धांत, शिकवण व श्रद्धा यांचा त्याग न करता सोसायटीचे सभासद झाले आहे व होत आहेत. म्हणून आता हितावह (desirable) हे आहे की सर्वांना हे पक्के माहित असायला हवे की असे कोणतेही सत्य वा सिद्धांत किंवा मत नाही, मग ते कोणीही सांगितलेले अथवा शिकवलेले असो; जे सोसायटीच्या कोणत्याही सभासदावर बंधनकारक असू शकेल. सोसायटीच्या सभासदाने ते मान्य करावे किंवा नाही याचे त्याला पूर्ण स्वातंत्र्य आहे. कोणाही टीचरला किंवा लेखकाला एच्. पी. ब्लॅव्हॅटस्की बाईंपासून ते आजपर्यंत आपले मत व उपदेश, शिकवण सभासदावर लादण्याचा अधिकार नाही. कोणत्याही विचार प्रवाहाबरोबर जाण्याचा, विचार-पंथाचा स्वीकार करण्याचा हक्क त्याला आहे, पण त्याचबरोबर आपली पसंती इतरांवर त्याला लादता येणार नाही. सभासदाचा त्याच्या वैयक्तिक मतामुळे मतदानाचा हक्क आणि निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून उभे राहण्याचा हक्क काढून घेता येणार नाही. मते अथवा श्रद्धा यांमुळे काही विशेष अधिकार मिळणार नाही किंवा शिक्षाही होणार नाही. थिऑसॉफिकल सोसायटीच्या सर्व सभासदांना जनरल कौन्सिलची कळकळीची विनंती आहे की, त्यांनी सोसायटीच्या या मूलभूत तत्वांचा आदर करून त्यांना अबाधित राखावे, त्यांचे संरक्षण करावे व त्याबरहुकुम आचरण करावे, सौजन्य बाळगून व इतरांची कदर करून निर्भयपणे मतप्रदर्शन व प्रगटीकरणाचा हक्क गाजवावा.

---

**संपर्क : 'विश्वबंधुत्व' – मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन**

९१८, शिवाजीनगर, गणेशवाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४.

दूरध्वनी:(०२०) ५६७०४१८

**Periodical Vishva Bandhutva**

**Reg. No. MAHMAR / 2003 / 7740**

# Printed Books

To,

From :

**Secretary,**
Marathi Theosophical Federation
C/O - The Poona Lodge, Theosophical Society
918, Shivajinagar, Ganeshwadi,
Deccan Gymkhana, Pune 411004.